Estd. 1962
NAAC 'A' Grade

SHIVAJI UNIVERISTY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX-2609000 website- www.unishivaji.ac.in
FAX 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333 – BOS - 2609094
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416004.
दुरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (अभ्यास मंडळे विभाग– २६०९०९४)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.e-mail:bos@unishivaji.ac.in

जावक क्र. No 1409

एस.यु. / अं.मं. /

दिनांक – 29 JUN 2020

प्रति,

अधिविभागप्रमुख / संचालक,
सर्व पदवी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

विषय : – बी.ए., बी.कॉम व बी.एस्सी. व अन्य (CBCS) भाग – 3 Compulsory Civic Course (CCC) च्या अभ्यासक्रमाबाबत......

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयांस अनुसरून विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2018 – 2019 पासून सुरू झालेल्या (बी.ए., बी.कॉम व बी.एस्सी. व अन्य) Choice Based Credity System (CBCS) मध्ये सेमीस्टर 5 मधील असलेल्या Compulsory Civic Course (CCC) Coinstutution of India या विषयाचा अभ्यासक्रम शैक्षणीक वर्ष 2020 – 2021 पासून लागू करण्यात येत आहे. सदर अभ्यासक्रम विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in (Student / Onlilne Syllabus) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे सदरचा अभ्यासक्रम संबंधित शिक्षक व विद्यार्थी यांच्या निर्दशनास आणावा.

कळावे,

आपल विश्वासू,

उपकुलसचिव

**Copy to,**

1. I/c Dean, All Faculty
2. Chairman, Concern Board of Studies
3. Director, BOEE

} for information

4. Appointment Section
5. P. G. Admission Section
6. B. A. , B.Com., B.Sc., O.E. 1 to 4 Section
7. Affiliation Section (U.G./P.G.)
8. Computer Center/I.T.
9. Eligibility Section
10. Distance Education
11. P.G. Seminer Section

– for information and necessary action.

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**Accredited By NAAC with 'A' Grade**

**Sem V: Soft Skill Course (SSC) – III**
**Introduction to Indian Constitution**

**Syllabus to be implemented from**

**June, 2020 onwards.**

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**

Compulsory Syllabus for Third Year Degree courses under All Faculties
Implemented from Academic year 2020-21

## Sem V: Soft Skill Course (SSC) – III
## Introduction to Indian Constitution

**Course Outcome:**

1) The students will get knowledge about making and philosophy of Indian Constitution
2) The students will become aware about Fundamental Rights, Directive Principles and Duties
3) The students will get knowledge about procedure of constitutional amendment.

**Module I: Historical Background, Making of Indian Constitution and Salient Features**

A) Historical Background of Indian Constitution: Acts of 1909, 1919 &1935
B) Making of Indian Constitution: Constituent Assembly
C) Salient Features of the Indian Constitution

**Module II: Philosophy, Fundamental Rights, Directive Principles and Fundamental Duties of the Indian Constitution**

A) Philosophy of the Indian Constitution: The Preamble
B) Fundamental Rights & Directive Principles of State Policy
C) Fundamental Duties

## Reference Books:

1) Basu D.D., Introduction to Constitution of India Princeton ,New Delhi,1994
2) M.Laxmikanth, Indian Polity, McGraw Hill Education,New Delhi,6th edition,2019
3) Abbas H. Kumar, Indian Government & Politics, Pearson New Delhi 2011
4) Awasti S.,S.,Indian Government and Politics,Haranand Publications Pvt.Ltd., 2009
5) Fadia, B.,L., Indian Government and Politics,Sahitya Bhavan,16th Revised Edition,2019
6) Kashyap Subhash,Our Constitution- An Introduction to India,s Constitution and Constitutional Law,National Book Trust,India,2007
7)Avasthi,A.,P., Indian Political System,Lakshmi Narain Agarwal,Agra,2004
8) जोशी प.ल.,आणि दवे,भारतीय शासन आणि प्रशासन, विद्या,नागपूर,1991
9) भोळे भास्कर ,भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण ,पिंपळापुरे,नागपूर,2010

10)जाधव तुकाराम व शिरपूरकर महेश , भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, भाग 1 आणि भाग २ ,दियुनिक
अकाडमी,पुणे,2011

***********

**Scheme of Teaching, Learning and Evaluation**

**Sem V: SSC – III : Introduction to Indian Constitution**

- This course is of Self Study mode. The study material of above course will be made available on University website.
- The Examination will be of 50 marks having 25 MCQ questions. Minimum 20 marks (40%) out of 50 are required for passing.
- The duration of examination shall be 60 minutes.
- The examination shall be conducted at the college level.
- The list of all candidates along with marks is to be submitted to the University
- . • The degree will be awarded only after successful completion of this courses.
- The Credits achieved by the successful student shall be separately mentioned in Result-sheet.

************

# भारतीय राज्यघटना

१) ब्रिटिश पार्लमेंटने मोर्ले—मिंटो सुधारणा कायदा ........... साली मंजूर केला.

अ) १९०९ ब) १९१९ क) १९३५ ड) १९४९

२) ...........साली भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाली.

अ) १८८५ ब) १८८७ क) १८८९ ड) यापैकी एकही नाही

३) ...........कायद्यानुसार मुस्लिमांना स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्यात आले.

अ) १९०९ ब) १९१९ क) १९३५ ड) यापैकी एकही नाही

४) ...........हा कायदा भारत व पाकिस्तान अशी फाळणी होण्याला कारणीभूत ठरला.

अ) १९०९ ब) १९०५ क) १९३५ ड) यापैकी एकही नाही

५) माँटेग्यू—चेम्सफोर्ड सुधारणा कायदा........... साली मंजूर झाला.

अ) १९०९ ब) १९१९ क) १९३५ ड) १९४९

६) भारतीय राज्यघटनेचा $\frac{2}{3}$ भाग ...........कायद्याच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

अ) १९०९ चा मार्ले—मिटों ब) १९१९ चा माँटेग्यू—चेम्सफोर्ड

क) १९३५ चा भारत प्रशासन कायदा ड) यापैकी एकही नाही

७) भारतात द्विगृही कायदेमंडळ पध्दतीची शिफारस...........कायद्यानुसार करण्यात आली.

अ) १९०९ च्या ब) १९१९ च्या क) १९३५ च्या ड) १९४७ च्या

८) ...........कायद्याच्या आधारे प्रांतिक सरकारच्या खात्यात राखीव खाती व सोपीव खाती असे दोन प्रकार पाडण्यात आले.

अ) १९१९ ब) १९०९ क) १९३५ ड) यापैकी एकही नाही

९) १९३५ च्या कायद्याने भारतात ........... कायदेमंडळ पध्दती स्वीकारण्यात आली.

अ) द्विगही ब) एकगृही क) बहुगृही ड) यापैकी एकही नाही

१०) १९३० साली गांधीजींनी...........चळवळ सुरु केली.

अ) सविनय कायदेभंगाची ब) कामगारांची

क) शेतकरी ड) यापैकी एकही नाही

११) सायमन कमिशनचा अहवाल आणि गोलमेज परिषदात घेण्यात आलेले निर्णय यांचा आधार घेऊन १९३३ साली ब्रिटिश शासनाने........... प्रकाशित केली.

अ) श्वेतपत्रिका ब) कृतिपत्रिका

क) प्रतिज्ञा प्रत्रिका ड) यापैकी एकही नाही

१२) भारतात जबाबदार शासनपध्दती आणि संसदीय लोकशाहीचा प्रयोग सुरु करण्याच्या दृष्टीने .. .........कायदा महत्वपूर्ण ठरला.

अ) १९०९ चा ब) १९१९ चा क) १९३५ चा ड) यापैकी एकही नाही

१३) ११ मार्च १९४२ रोजी इंग्लंडचे पंतप्रधान ..........यांनी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली भारतात एक पाहणी शिष्टमंडळ पाठविले होते.

अ) विन्स्टन चर्चिल ब) लॉर्ड ॲटली

क) हॅरॉल्ड विल्सन ड) यापैकी एकही नाही

१४) ब्रिटिश पार्लमेंटने इ.स. १७७३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ..........हा कायदा संमत केला.

अ) पिटस् इंडिया ॲक्ट ब) रेग्युलेटिंग ॲक्ट

क) इंडिया कौन्सिल ॲक्ट ड) यापैकी एकही नाही

१५) "दिवाळे निघालेल्या बँकेवर काढलेला पुढील तारखेचा चेक" अशा शब्दात ..........यांनी क्रिप्स योजनेचा निषेध केला.

अ) पंडित जवाहरलाल नेहरु ब) महात्मा गांधीजी

क) सी. डी. देशमुख ड) यापैकी एकही नाही

१६) ..........कायद्यानुसार भारतात संघराज्य शासनपध्दती सुरु करण्यात आली.

अ) १९३५ ब) १९०९ क) १९३८ ड) यापैकी एकही नाही

१७) १९४६ साली ब्रिटनचे पंतप्रधान ..........यांनी आपल्या मंत्रिमंडळातील (तीन मंत्री) सर पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स आणि अल्बर्ट ॲलेक्झांडर यांचे कॅबिनेट मिशन भारतात पाठवून तेथील राजकीय स्थितीचा अभ्यास केला.

अ) लॉर्ड ॲटली ब) विन्स्टन चर्चिल

क) चेम्बरलीन ड) यापैकी एकही नाही

१८) १९४२ साली ..........यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशभर 'चलेजावची चळवळ' सुरु करुन ब्रिटिशांनी भारत सोडून निघून जावे असे सांगण्यात आले.

अ) सुभाषचंद्र बोस ब) महात्मा गांधी

क) पंडित जवाहरलाल नेहरु ड) यापैकी एकही नाही

१९) ..........रोजी पंडित नेहरुंच्या नेतृत्वाखाली भारतात हंगामी सरकार स्थापन करण्यात आले होते.

अ) २ सप्टेंबर १९४६ ब) १६ जून १९४६

क) २० फेब्रुवारी १९४७ ड) यापैकी एकही नाही

२०) ..........योजनेच्या आधारे देशाच्या फाळणीसंबंधीचे विधेयक तयार करुन ब्रिटिश पार्लमेंटच्या समोर ठेवण्यात आले. पार्लमेंटने १८ जुलै, १९४७ रोजी त्यास मंजुरी दिली.

अ) माउंटबॅटन ब) त्रिमंत्री (कॅबिनेट मिशन)

क) सर स्टॅफर्ड क्रिप्स ड) यापैकी एकही नाही

२१) ..........यांनी ॲनी बेझंट यांच्या सहकार्याने 'होमरुल चळवळ' चालू ठेवून भारतीयांना स्वयंनिर्णयाचा अधिकार प्राप्त व्हावा यासाठी राष्ट्रीय आंदोलन केले होते.

अ) महात्मा गांधी ब) लोकमान्य टिळक

क) वि. दा. सावरकर ड) यापैकी एकही नाही

२२) १९४६ च्या त्रिमंत्री योजनेनुसार .......... सदस्यांची घटना समिती स्थापन करण्यात आली होती.

अ) ३७९ ब) ३८९ क) ३९० ड) ३९५

२३) भारतीय घटना परिषदेचे अध्यक्षपद.......... यांच्याकडे दिले होते.

अ) सरदार वल्लभभाई पटेल ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क) डॉ. बाबू राजेंद्र प्रसाद ड) डॉ. सच्चिदानंद सिन्हा

२४) भारतीय 'घटना मसुदा समितीचे' अध्यक्षपद .......... यांना दिले होते.

अ) बॅ. जीना ब) पंडित जवाहरलाल नेहरु

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ड) डॉ. बाबू राजेंद्र प्रसाद

२५) कॅबिनेट मिशन योजनेनुसार भारतासाठी नवीन राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समितीत . .........सदस्य संख्या निश्चित करण्यात आली.

अ) ३८९ ब) ३८५ क) ३८० ड) यापैकी नाही

२६) घटनानिर्मितीचे कार्य ..........वर्षे..........महिने..........दिवस चालले.

अ) २ वर्षे ११ महिने १८ दिवस ब) २ वर्षे १० महिने १८ दिवस

क) २ वर्षे ५ महिने २० दिवस ड) यापैकी नाही

२७) ९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीची पहिली बैठक..........येथे घेण्यात आली.

अ) दिल्ली ब) मुंबई क) कलकत्ता ड) पुणे

२८) भारतीय घटनेत..........कलमे व ..........परिशिष्टे आहेत.

अ) ३९५ कलमे व १४ परिशिष्टे ब) ३९० कलमे व १० परिशिष्टे

क) ३८५ कलमे व १० परिशिष्टे ड) यापैकी एकही नाही

२९) भारताच्या राज्यघटनेची अंमलबजावणी..........पासून सुरु करण्यात आली.

अ) २६ जानेवारी १९५० ब) १५ ऑगस्ट १९४७

क) २६ नोव्हेंबर १९४९ ड) यापैकी एकही नाही

३०) 'दिवाळे निघालेल्या बँकेवर काढलेला पुढील तारखेचा चेक' अशा शब्दात महात्मा गांधी यांनी ..........योजनेचा निषेध केला होता.

अ) क्रिप्स ब) कॅबिनेट मिशन क) वेव्हेल ड) यापैकी एकही नाही

३१) घटना समितीच्या प्रांतीय उपसमितीचे अधक्षपद..........यांच्याकडे दिले होते.

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) सरदार वल्लभभाई पटेल

क) बी.एन.राव ड) यापैकी एकही नाही

३२) घटना समितीच्या मार्गदर्शक (Steering) उपसमितीचे अधक्षपद ........... यांना देण्यात आले होते.

अ) डॉ. बाबू राजेंद्र प्रसाद ब) बी.एन.राव

क) सरदार वल्लभभाई पटेल ड) यापैकी एकही नाही

३३) भारतीय राज्यघटनेत ........... कलमे आहेत.

अ) ३६० ब) ३९५ क) ४१० ड) यापैकी एकही नाही

३४) भारत हे राष्ट्र...........स्वरुपाचे राज्य आहे.

अ) धार्मिक ब) धर्मनिरपेक्ष क) धर्माधिष्ठित ड) धर्मबाहय

३५) भारताने........... शासनपध्दती स्वीकारली आहे.

अ) संसदीय ब) अध्यक्षीय क) संमिश्र ड) सर्वंकष

३६) भारतीय राज्यघटनेला ...........परिशिष्टे जोडण्यात आलेली आहेत.

अ) १० ब) १२ क) १४ ड) १५

३७) भारतीय घटनाकारांनी केंद्र–राज्य संबंधाच्या संदर्भात सामाईक सूची (यादी) ही संकल्पना....... ....देशाच्या राज्यघटनेवरुन घेतलेली आहे.

अ) अमेरिका ब) ऑस्ट्रेलिया क) आयर्लंड ड) सोव्हिएट रशिया

३८) भारतीय राज्य संघराज्यात्मक वाटत असले तरी प्रत्यक्षात ते ...........स्वरुपाचे आहे.

अ) एकात्मक ब) द्विदल क) अनेकात्मक ड) यापैकी एकही नाही

३९) १९८९ साली ६१ वी घटनादुरुस्ती होऊन भारतीय मतदाराची वयाची अट ........... वर्षे करण्यात आलेली आहे.

अ) १८ ब) २० क) २१ ड) २५

४०) भारताची राज्यघटना...........स्वरुपाची राज्यघटना आहे.

अ) निर्मित व लिखित ब) अलिखित व लवचीक

क) अलिखित व परिदृढ ड) यापैकी एकही नाही

४१) ...........या देशाची राज्यघटना ही जगातील सर्व राज्यघटनात सर्वात मोठी विस्तृत राज्यघटना म्हणून ओळखली जाते.

अ) भारत ब) अमेरिका क) इंग्लंड ड) यापैकी एकही नाही

४२) भारताची राज्यघटना...........स्वरुपाची आहे.

अ) अंशत: परिदृढ व अंशत: परिवर्तनीय ब) परिवर्तनीय

क) परिदृढ ड) यापैकी एकही नाही

४३) घटनादुरुस्तीच्या विधेयकाला संसदेच्या दोन्ही गृहांची...........बहुमताने मंजुरी घ्यावी लागते.

अ) $\frac{2}{3}$ ब) $\frac{3}{4}$ क) $\frac{1}{2}$ ड) यापैकी नाही

४४) ..........घटनादुरुस्ती ही भारतीय राज्यघटनेतील सर्वात मोठी घटनादुरुस्ती म्हणून ओळखली जाते.

अ) ४२ वी ब) ४४ वी क) ४१ वी ड) यापैकी नाही

४५) भारतीय राज्यघटनेच्या.......... या कलमात पंतप्रधान व मंत्रिमंडळ याविषयी तरतूद आढळते.

अ) ७४ व ७५ ब) १४ व १५ क) ६१ व ६२ ड) यापैकी नाही

४६) भारतात पंतप्रधान हा ..........प्रमुख आहे.

अ) वास्तववादी ब) नामधारी

क) कायमस्वरुपी ड) यापैकी एकही नाही

४७) पंतप्रधान हा आपल्या सर्व मंत्र्यासह संयुक्तरित्या नेहमी.......... जबाबदार असतो.

अ) राज्यसभेला ब) लोकसभेला

क) विधानसभेला ड) यापैकी एकही नाही

४८) भारताचे राष्ट्रपती.......... घटनात्मक प्रमुख आहे.

अ) वास्तववादी ब) नामधारी

क) कायमस्वरुपी ड) यापैकी एकही नाही

४९) संसदेचे वरिष्ठ गृह म्हणून .......... गृहाला ओळखले जाते.

अ) राज्यसभा ब) लोकसभा

क) विधान परिषद ड) यापैकी एकही नाही

५०) राज्यसभा या वरिष्ठ गृहात .......... सभासद असतात.

अ) २५० ब) २२० क) ५५० ड) १००

५१) भारतीय राज्यघटनेत केंद्र यादीत .......... विषय आहेत.

अ) ६१ ब) ९९ क) ५२ ड) यापैकी नाही

५२) भारतीय राज्यघटनेत राज्य यादीत..........विषय दिलेले आहेत.

अ) ६१ ब) ५२ क) ९९ ड) यापैकी एकही नाही

५३) लोकसभेत अनुसूचित जातीसाठी.......... आणि अनुसूचित जमातीसाठी .........जागा राखीव ठेवलेल्या आहेत.

अ) ७० आणि ४२ ब) ७२ आणि ५०

क) ७० आणि ३२ ड) यापैकी एकही नाही

५४) भारतीय राज्यघटनेने ..........नागरिकत्वाचा पुरस्कार केलेला आहे.

अ) दुहेरी ब) एकेरी

क) अनिवासी ड) यापैकी एकही नाही

५५) भारतीय राज्यघटनेच्या कलम ..........मध्ये असे नमूद केले आहे की, 'संघराज्यासाठी एक संसद असेल आणि राष्ट्रपती व अनुक्रमे राज्यसभा व लोकसभा म्हणून ओळखली जाणारी अशी दोन सभागृहे मिळून ती बनलेली असेल.'

अ) ७९ ब) ८० क) ८१ ड) ८२

५६) राज्यसभा हे ..........सभागृह आहे.

अ) कायमस्वरुपी ब) बदलणारे

क) अस्थिर ड) यापैकी एकही नाही

५७) राज्यघटनेची अंमलबजावणी ही तिच्या स्वरुपावर अवलंबून नसते तर ती देशातील जनता व राजकीय पक्ष यावर अवलंबून असते. जनता व राजकीय पक्ष कोणत्या मार्गांनी आणि कसे वागतील यावर घटनेचे भवितव्य अवलंबून असते. हे वक्तव्य .......... या विचारवंताचे आहे.

अ) महात्मा गांधी ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क) डॉ. बाबू राजेंद्र प्रसाद ड) कन्हैयालाल मुन्शी

५८) भारतात न्यायदान पध्दती .......... स्वरुपाची आहे.

अ) एकेरी ब) दुहेरी क) तिहेरी ड) यापैकी एकही नाही

५९) ..........देशाची राज्यघटना ही जगातील सर्व राज्यघटनात सर्वात मोठी, विस्तृत राज्यघटना म्हणून ओळखली जाते.

अ) अमेरिका ब) इंग्लंड क) भारत ड) स्वित्झर्लंड

६०) संसदेच्या लोकसभा या कनिष्ठ गृहात .......... सदस्य संख्या असते.

अ) ५५० ब) ५४० क) ५४५ ड) यापैकी नाही

६१) संसदेच्या लोकसभा या गृहाची मुदत .......... वर्षे असते.

अ) ५ वर्षे ब) ६ वर्षे क) ४ वर्षे ड) यापैकी नाही

६२) घटनातज्ज्ञ ..........यांनी भारतीय राज्यघटनेत 'एक महत्वाचे सामाजिक दस्तऐवज' असे वर्णन करु असे म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेतील सर्व तरतुदी सामाजिक क्रांतीसाठी आवश्यक ती परिस्थिती निर्माण करणाऱ्या आहेत.

अ) ग्रॅनव्हिले ऑस्टिन ब) नानी पालखीवाला

क) एच.एम. सिरवाई ड) यापैकी एकही नाही

६३) २०१६ साली ..........क्रमांकाचे जी.एस.टी. चे विधेयक भारतीय संसदेने मंजूर केले आहे.

अ) १०४ ब) ११६ क) १२२ ड) यापैकी एकही नाही

६४) ..........रोजी भारतीय राज्यघटनेचा सरनामा मान्य करुन त्यासंबंधी कायदा करुन तो स्वीकारण्यात आला.

अ) २६ नोव्हेंबर १९४९ ब) १५ ऑगस्ट १९४७

क) २६ जानेवारी १९५०　　　　ड) यापैकी एकही नाही

६५) ..........घटनादुरुस्तीने भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात ‘समाजवादी’ व ‘धर्मनिरपेक्ष’ (धर्मातीत) हे दोन शब्द नव्याने स्वीकारले आहेत.

अ) ४२ वी　　ब) ४३ वी　　क) ६१ वी　　ड) यापैकी एकही नाही

६६) भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात..........ची घोषणा करण्यात आली.

अ) प्रजासत्ताक गणराज्य　　　　ब) साम्यवादी शासन

क) भांडवलवादी शासन　　　　ड) यापैकी एकही नाही

६७) भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान सांगणारी उद्देशपत्रिका ही एक राजकीय कुंडली आहे असे श्री.. ......... यांनी म्हटलेले आहे.

अ) कन्हैयालाल मुन्शी　　　　ब) एम. व्ही. पायली

क) प्रा. त्र.सी.टोपे (घटनातज्ज्ञ)　　　　ड) यापैकी एकही नाही

६८) राज्यघटनेची उद्दिष्टे, ध्येये सारांशरुपाने सांगणाऱ्या उद्देशपत्रिकेला.......... या नावाने संबोधण्यात येते.

अ) जाहीरनामा　ब) सरनामा　　क) हुकूमनामा　　ड) लोकनामा

६९) घटनेने जनतेचे सार्वभौमत्व मान्य करुन..........शासन पध्दतीचा पुरस्कार केलेला आहे.

अ) प्रातिनिधिक संसदीय लोकशाही　　　　ब) प्रत्यक्ष लोकशाही

क) अध्यक्षीय लोकशाही　　　　ड) यापैकी एकही नाही

७०) ..........या राजकीय विचारवंताने आपल्या Principles of Social and Political Theory या ग्रंथाच्या प्रस्तावनेत भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका छापलेली आहे.

अ) प्रा. अर्नेस्ट बार्कर　　　　ब) पं. जवाहरलाल नेहरु

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर　ड) यापैकी एकही नाही

७१) भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यावर..........देशाचा प्रभाव पडला आहे.

अ) आयर्लंड　　ब) अमेरिका　　क) ऑस्ट्रेलिया　　ड) रशिया

७२) ..........खटल्याच्या निर्णयाने सरनामा हा घटनेचा एक भाग मानला गेला.

अ) केशवानंद भारती　　　　ब) बोम्मई खटला

क) गोलकनाथ विरुध्द पंजाब　ड) यापैकी एकही नाही

७३) देशातील सामाजिक विषमता दूर करुन सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी घटनेने ........ ...कलमामध्ये अस्पृश्यता नष्ट करण्याची तरतूद केलेली आहे.

अ) १७　　ब) १९　　क) २०　　ड) यापैकी नाही

७४) भारतीय राज्यघटनेने २५ ते २८ या कलमात ..........अधिकार स्पष्ट केलेला आहे.

अ) स्वातंत्र्याचा　　　　ब) समतेचा

क) धार्मिक स्वातंत्र्याचा　　　　ड) यापैकी एकही नाही

७५) १९७६ साली .......... व्या घटनादुरुस्तीने भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात 'समाजवादी' हा शब्द नव्याने घालण्यात आलेला आहे.

अ) ४२ ब) ४४ क) ६१ ड) यापैकी एकही नाही

७६) भारत हे ..........राज्य आहे.

अ) प्रजासत्ताक गणराज्य ब) सर्वंकष सत्ता

क) भांडवलवादी ड) यापैकी एकही नाही

७७) भारतीय राज्यघटनेच्या .......... विभागात मूलभूत अधिकार देण्यात आलेले आहेत.

अ) सातव्या ब) दुसऱ्या क) तिसऱ्या ड) पहिल्या

७८) घटनात्मक उपयाचा अधिकार भारतीय राज्यघटनेच्या कलम .......... मध्ये स्पष्ट केलेला आहे.

अ) ३१ ब) ३२ क) ५१ ड) ५१—क

७९) भारतीय राज्यघटनेच्या कलम २५ व २६ मध्ये ..........स्वातंत्र्याचा अधिकार नागरिकांना दिलेला आहे.

अ) सांस्कृतिक ब) धार्मिक क) शैक्षणिक ड) राजकीय

८०) नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी भारतीय राज्यघटनेच्या ..........व्या कलमात तरतूद केलेली आहे.

अ) १७ ब) १९ क) ३२ ड) ३७

८१) १८७८ साली ४४ व्या घटनादुरुस्तीने मूलभूत अधिकारांच्या यादीतील ..........अधिकार रद्द करण्यात आलेला आहे.

अ) स्वातंत्र्याचा ब) मालमत्तेचा क) धार्मिक ड) राजकीय

८२) समतेसाठी अस्पृश्यता निवारण्याचा कायदा .......... साली संसदेने मंजूर केला.

अ) १९५१ ब) १९५५ क) १९६१ ड) १९७६

८३) भारतीय राज्यघटनेच्या कलम २९ व ३० मध्ये ..........अधिकार स्पष्ट केलेला आहे.

अ) स्वातंत्र्याचा ब) सांस्कृतिक व शैक्षणिक

क) मालमत्तेचा ड) समतेचा

८४) कायद्यासमोर सर्वांना समानतेने वागविले जाईल असे भारतीय घटनेच्या ..........व्या कलमात म्हटले आहे.

अ) १४ ब) १९ क) २९ ड) ३२

८५) प्रतिबंधक स्थानबध्दतेचा कायदा आणि मिसा, टाडा, पोटो, मोका यामुळे नागरिकांच्या.......... मर्यादा पडलेली आहे.

अ) मालमत्तेवर ब) स्वातंत्र्यावर क) कर्तव्यांवर ड) यापैकी एकही नाही

८६) भारतीय राज्यघटनेतील मुलभूत अधिकारांची संख्या ..........आहे.

अ) पाच ब) सात क) सहा ड) दहा

८७) ..........न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देऊन मूलभूत अधिकारांचे रक्षण केले जाते.

अ) सर्वोच्च न्यायालयाला ब) राष्ट्रपतींना

क) उच्च न्यायालयाला ड) यापैकी एकही नाही

८८) ..........या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात.

अ) हक्क आणि कर्तव्ये ब) समता आणि स्वातंत्र्य

क) न्याय आणि अधिकार ड) यापैकी एकही नाही

८९) भारतीय राज्यघटनेच्या २३ व्या आणि २४ व्या कलमात ..........अधिकार देऊन लोकांचे आर्थिक, सामाजिक व शारीरिक शोषण थांबविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अ) शोषणाविरुध्दचा किंवा पिळवणुकीविरुध्दचा ब) स्वातंत्र्याचा

क) समतेचा ड) यापैकी एकही नाही

९०) राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी शासनाने..........कायदा निर्माण केलेला आहे.

अ) प्रतिबंधक स्थानबध्दतेचा ब) पोटा

क) मोका ड) यापैकी एकही नाही

९१) ..........यांच्या मते, 'व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत अधिकारांची गरज असते. प्रत्येक व्यक्तीला तिचा राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास साधता आला पाहिजे अशी परिस्थिती राज्याने निर्माण केली पाहिजे'.

अ) हॅरॉल्ड लास्की ब) जे. एस. मिल

क) टी. एच. ग्रीन ड) यापैकी एकही नाही

९२) कोणत्याही व्यक्तीला बेकायदेशीररित्या अटक करुन ठेवले तर त्या व्यक्तीला किंवा तिच्या मित्राला किंवा नातलगाला न्यायालयाकडे घटनात्मक अर्ज करता येतो. यालाच .......... अधिकार असे म्हणतात.

अ) बंदी प्रत्यक्षीकरणाचा ब) परमादेश

क) अधिकार पृच्छा ड) प्रतिषेध

९३) रमेश थापर विरुध्द मद्रास राज्य तसेच ब्रिजभूषण विरुध्द दिल्ली राज्य खटल्यात न्यायालयांनी .......... वर घातलेली अमर्याद बंधने अवैध ठरविली.

अ) वृत्तपत्र स्वातंत्र्य ब) भाषण स्वातंत्र्य

क) सभा स्वातंत्र्य ड) संचार स्वातंत्र्य

९४) भारतीय राज्यघटनेच्या कलम ..........मध्ये नागरिकांना स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे.

अ) १९ ब) २५ क) २६ ड) ३२

९५) ..........यांनी असे म्हटले आहे की, 'घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार हा राज्यघटनेचा आत्मा आणि हृदय आहे.

अ) पंडित जवाहरलाल नेहरु ब) महात्मा गांधी

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ड) यापैकी एकही नाही

९६) भारतीय राज्यघटनेच्या.......... विभागात मूलभूत अधिकार देण्यात आलेले आहेत.

अ) सातव्या ब) दुसऱ्या क) तिसऱ्या ड) पहिल्या

९७) प्रा. के. टी. शहा यांच्या मते, बँकेच्या सोईनुसार वटविला जाणारा चेक म्हणजे..........होत. कारण त्यांना न्यायालयीन संरक्षण नसल्यामुळे त्यांची अंमलबजावणी करणे हे राज्याच्या इच्छेवर अवलंबून असते.

अ) मूलभूत हक्क ब) मार्गदर्शक तत्वे

क) मूलभूत कर्तव्ये ड) यापैकी एकही नाही

९८) आयर्लंड, ब्रह्मदेश, स्पेन, चीन,युगोस्लाव्हिया, नेपाळ इत्यादी देशांच्या राज्यघटनेतील .......... .यांचा विचार करुन भारतीय राज्यघटनेने ती स्वीकारलेली आहेत.

अ) मार्गदर्शक तत्वे ब) मूलभूत अधिकार

क) मूलभूत कर्तव्ये ड) यापैकी एकही नाही

९९) ..........यांच्या मते, 'मार्गदर्शक तत्वांचे पूर्णपणे पालन झाले तर भारत देश पृथ्वीवरील स्वर्ग होईल'.

अ) न्यायमूर्ती छगला ब) श्री. अलादी कृष्णस्वामी

क) एम. व्ही. पायली ड) के.सी. व्हीअर

१००) ..........यांच्या मते, 'आपल्या देशाचा आर्थिक मागासलेपणा दूर करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे प्रत्यक्षात आणणे हा सर्वोत्तम उपाय आहे.'

अ) तुषार चटर्जी ब) नानी पालखीवाला

क) श्रीनिवासन ड) यापैकी एकही नाही

१०१) १९७६ साली ..........घटनादुरुस्ती होऊन राज्याच्या धोरणासंबंधीच्या मार्गदर्शक तत्वांना संरक्षण देण्यात आलेले आहे.

अ) ४२ वी ब) ४४ वी क) ४९वी ड) यापैकी एकही नाही

१०२) भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या विभागात कलम .......... मध्ये राज्याच्या धोरणासंबधीची मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली आहेत.

अ) ३६ ते ५१ ब) १४ ते १९ क) २५ ते २८ ड) यापैकी एकही नाही

१०३) मार्गदर्शक तत्वांच्या यादीत कलम ..........मध्ये मुलामुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यात येईल असे स्पष्ट केले आहे.

अ) ४५ ब) ४६ क) ४९ ड) ५१

१०४) मार्गदर्शक तत्वांच्या यादीत आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन ..........व्या कलमात स्पष्ट करण्यात आलेले आहे.

अ) ५१ ब) ४४ क) ४९ ड) यापैकी एकही नाही

१०५) १९ नोव्हेंबर १९४८ रोजी मार्गदर्शक तत्वे ही कायदेमंडळ व मंत्रिमंडळ यांनी राज्यकारभार कसा करावा यासंबंधी दिलेले ते आदेश आहेत. ही मागदर्शक तत्वे त्यांच्या कृतीचा पाया बनली पाहिजेत, असे मत .......... यांनी मांडले होते.

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) पंडित जवाहरलाल नेहरु

क) महात्मा गांधीजी ड) यापैकी एकही नाही

१०६) 'स्त्री व पुरुष या दोघांना समान वेतन मिळावे', हे मार्गदर्शक तत्व .......... स्वरुपाचे आहे.

अ) आर्थिक ब) राजकीय क) सामाजिक ड) न्यायालयीन

१०७) ..........साली ४२ व्या घटनादुरुस्तीने भारतीय घटनेत दहा मूलभूत कर्तव्यांचा समावेश केलेला आहे.

अ) १९७६ ब) १९७८ क) १९७१ ड) यापैकी एकही नाही

१०८) भारतीय राज्यघटनेच्या ..........प्रकरणात ..........कलमात दहा मूलभूत कर्तव्यांचा समावेश केलेला आहे.

अ) चौथ्या – ५१ क ब) पाचव्या – ५२ क

क) तिसऱ्या – ३८ क ड) यापैकी एकही नाही

१०९) मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणी ..........रोजी सुरु झाली.

अ) ३ जानेवारी १९७७ ब) ३ जानेवारी १९७६

क) ३ जानेवारी १९७५ ड) यापैकी एकही नाही

११०) खालीलपैकी ..........मूलभूत कर्तव्य आहे.

अ) राज्यघटनेचे पालन करणे. ब) देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणे.

क) नैसर्गिक साधनसंपत्तीचे रक्षण करणे. ड) वरील सर्व योग्य आहेत.

१११) भारतीय राज्यघटनेत मूलभूत कर्तव्ये असावीत असा ..........समितीने सल्ला दिला.

अ) स्वर्णसिंग ब) बळवंतराय मेहता

क) अशोक मेहता ड) यापैकी एकही नाही

११२) ..........यांनी घटना परिषदेच्या समारोपाच्या भाषणात भारतीय जनतेच्या ऐक्याविषयी, बंधुत्वाविषयी भारतीय जनतेला जाणीव करुन दिली होती.

अ) पंडित जवाहरलाल नेहरु ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क) बाबू राजेंद्र प्रसाद ड) यापैकी एकही नाही

११३) भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये म्हणून ........... विधान योग्य आहे.

अ) भारतीय रेल्वे ही राष्ट्रीय संपत्ती असून तिचे संरक्षण प्रत्येक नागरिकाने केले पाहिजे.

ब) प्रत्येक भारतीय व्यक्ती आपल्या चारित्र्यसंवर्धनासाठी संपत्ती मिळवीत असते.

क) प्रत्येक भारतीय नागरिकाला भाषण स्वातंत्र्य आहे.

ड) प्रत्येक भारतीयाने आपल्या देशाच्या नैसर्गिक संपत्तीचे रक्षण केले पाहिजे.

११४) राज्याची संस्था, उद्दिष्टे, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा सन्मान राखल्यामुळे नागरिकांत राष्ट्राभिमान वाढीला लागतो, राष्ट्रीयत्वाची भावना जोपासला जाते तेव्हा प्रत्येक नागरिकाला आपल्या... ........जाणीव होते.

अ) मूलभूत हक्काची　　ब) मूलभूत कर्तव्याची

ड) जबाबदारीची　　क) यापैकी एकही नाही

११५) 'देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाला सैनिकी प्रशिक्षण दिले पाहिजे.' राज्यशास्त्रातील...........ही राजकीय संकल्पना आहे.

अ) मूलभूत हक्क　　ब) मूलभूत कर्तव्य

क) राज्याच्या धोरणाचे मार्गदर्शक तत्व　　ड) यापैकी एकही नाही

११६)'वैज्ञानिक दृष्टिकोण, मानवतावादी दृष्टिकोण, संशोधन वृत्ती आणि साधारणावाद, याविषयी प्रत्येक भारतीयाला जाणीव असली पाहिजे.' ही...........संकल्पना आहे.

अ) मूलभूत अधिकार　　ब) मार्गदर्शक तत्वे

क) मूलभूत कर्तव्ये　　ड) यापैकी एकही नाही